VOL- VII ISSUE- VIII AUGUST 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# भारतीय इतिहासात भक्ति आंदोलनाची भुमिकाः एक ऐतिहासीक अध्ययन

प्रा. डॉ. प्रज्ञा बी. कामडी
इतिहास विभाग प्रमुख
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड

*सारांश*

*भक्ति आंदोलन मध्यकालीन भारताच्या इतिहासात एक महत्वपुर्ण टप्पा मानला जातो. भारतीय इतिहासात मध्यकाळ हा राजनितीक, सांस्कृतीक, आर्थिक व सामाजीक इ. सर्व दृष्टीने परिवर्तन करणारा ठरला. भक्ती आंदोलन देशव्यापी आंदोलन होते या आंदोलनामुळे हिंदू आणि मुस्लिम धर्मातील परस्पर कटुता, संघर्ष कमी होऊन सर्वधर्म सहिष्णुतेचे वातावरण निर्माण होऊन भारतात नवचैतन्य जागृत झाले. यातून भारतीय संस्कृती आणि समाजाला नविन दिशा मिळाली. प्रस्तुत शोध निबंधात भारतीय इतिहासात भक्ति आंदोलनाची भुमिका यावर अध्ययन करण्यात आले आहे.*

*बिज संज्ञाः भारतीय इतिहास, भक्ति आंदोलन, भारतीय संस्कृती, भक्ति चळवळ, समजावादी आंदोलन.*

## प्रस्तावना

मध्यकालीन भारताचा इतिहास हा परिवर्तनाचा कालखंड. हे परिवर्तन केवळ राजकीय नाही तर ससंस्कृतीक, कला, साहित्य आणि सामाजिक या दृष्टीनेही क्रांतीकारी ठरले. भारतात मुस्लीम सत्ता प्रस्तापीत झाली. इस्लामी सत्तेच्या प्रसाराबरोबरच आपसी सौहार्द, सद्भाव, सामाजिक, सांस्कृतीक संपर्क वाढला. उच्च निच्च, जाती–पाती या पलीकडे जाऊन सर्वसामान्य कुटूंबातील संतानी समाजप्रबोधना बरोबरच क्रांतीकारी परिवर्तनाला सुरूवात केली. त्यातुनच भक्ती आंदोलनाचा उदय झाला.

भक्ति आंदोलन मध्यकालीन भारताच्या इतिहासात एक महत्वपुर्ण टप्पा मानला जातो. सामाजिक, धार्मिक सुधारकांनी मुळ क्रांती करून एक नविन दिशा दाखवून दिली. भक्ती आंदोलन हिंदुचे सुधारवादी आंदोलन होते. यात ईश्वराच्या प्रती असिम भक्ती बरोबरच एकता, बंधुता, सर्व समानतेची भावना व जातीभेद, कर्मकांडाची निर्भत्सना केली गेली. भक्ती आंदोलन देशव्यापी आंदोलन होते या आंदोलनामुळे हिंदू आणि मुस्लिम धर्मातील परस्पर कटुता, संघर्ष कमी होऊन सर्वधर्म सहिष्णुतेचे वातावरण निर्माण होऊन भारतात नवचैतन्य जागृत झाले. यातून भारतीय संस्कृती आणि समाजाला नविन दिशा मिळाली.

भक्ती आंदोलन निर्माण होण्याची कारणे किंवा तत्कालीन परिस्थिती

1)मुस्लिम आक्रमणामुळे हिंदुधर्मामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. मुर्ती भंजक मुस्लिमांनी मुर्ती पुजक असलेल्या हिंदुच्या मंदिरावर, धार्मिक स्थळांवर आघात केला. या आघातातुन बाहेर काढुन धार्मिक विचारवंतांनी समाजाला भक्ती मार्गाकडे प्रेरित केले.

2)या काळात अंधश्रध्दा, व्रतवैफल्ये, जात–पात, मुर्तीपुजा, कर्मकांड इण च मोठयाप्रमाणात स्तोम निर्माण झालेले होते. अश्यावेळी मुस्लीम आक्रमकांनी मंदिरावर केलेला हल्ल्यामुळे हिंदू सैरवैर झालेले होते अश्यावेळी सौहादार्याचे वातावरण तयार करून तणावाचे वातावरण कमी करण्याची गरज

होती. ही गरज भक्ती चळवळीच्या संतांनी पुर्ण केली.

3)सर्वसाधारण लोकांमध्ये हिंदू धर्माचे तत्व रूजविण्यासाठी तसेच धर्माला अधिक सक्रिय करण्यासाठी मध्यकालीन धार्मिक विचारवंतांनी भक्ति मार्गाला विशेष महत्व दिले.

4)मुसलमानांनी मंदिरांचा विध्वंस केल्यामुळे हिंदूंची विहीकेंद्रे नष्ट झाली. असाहाय हिंदू प्रजेसाठी वैदिक कर्मकांडाची, धार्मिक समारंभाची कल्पना करणे अशक्य झाले होते. रक्षणकर्त्या प्रबळ हिंदू राजसत्ते अभावी केविलवाण्या अवस्थेत जीवन जगणाऱ्या हिंदू प्रजेला ईश्वरी भक्ति मार्गावाचून उपाय उरला नव्हता.

5)तुर्कांच्या विध्वसंक विनाशकारी भौतिक आक्रमणाला भारतीय संतांच्या भक्ति चळवळीने दिलेले हे तात्वीक उत्तर होते.

6)सामाजिक, धार्मिक, राजकीय नेतृत्व भ्रामक कल्पनांनी इध्द असतांना प्रसंगी मरण किंवा धर्मांतरण हे दोनच पर्याय असलेल्या हिंदू समाजाला या परिस्थितीतुन बाहेर काढुन सन्मानाने, स्वतंत्रपणे जीवन जगण्यासाठी प्रखर चळवळीची गरज होती.

तलवारीच्या जोरावर राज्य जिंकुन धर्मांतर करायला लावून संपुर्ण भारत ईस्लाममय करण्याच्या उद्देशाने प्रेरित असलेल्या मुस्लिम सत्ताधिशांना सडेतोड उत्तर देणाऱ्या व सर्वांना एका सुत्रात गुंफुन ठेवून सर्वधर्म सहिष्णुता तत्व रूजविण्याची गरज या काळात निर्माण झाली होती. ती गरज भक्ति आंदोलकांनी पुर्ण करून संपुर्ण भारतात तत्कालीन परिस्थितीवर मात करून सहिष्णुततेचे वातावरण निर्माण केले.

भक्ति आंदोलनाची वैशिष्टे

1) एकश्वरवादः हिंदू धर्मात मुर्तीपुजेला वाव असुन तत्कालीन धर्मात मुर्तीपुजेला अनन्यसाधारण महत्व होते. भक्ती आंदोलकांनी ईश्वर एकच आहे म्हणजेच एकेश्वरवाद तत्व अवलंबून ईस्लाम धर्माचे अनुकरण केले. अनेक देवतांवादामुळ तत्कालीन धर्माला धार्मीक अवडंबरता पाप्त झाली होती. ईश्वर एकच आहे. संपुर्ण विश्वातील मानवाचा ईश्वर एकच आहे हे भक्ती चळवळीच्या संतानी अवलंबवीले.

2) कर्मकांड व यज्ञाचा त्यागः बहुदेववादामुळे पौराहित्य, मुर्तीपूजा, कर्मकांड, यज्ञ पध्दती इ. मुळे समाज धार्मिक अवडंबरात गुरफटलेला होता. यातुन बाहेर काढण्याचे कार्य भक्तिसंतानी केले. कर्मकांड व यज्ञाचा त्याग ही तत्वे रूजविली.

3) समतावादी आंदोलन जाती धर्माचा निषेधः भक्ति आंदोलन समतावादी आंदोलन होते या चळवळीच्या नेत्यांनी ईस्लाम धर्म व संस्कृती, तसेच हिंदु धर्म व संस्कृती यांची सांगड घालुन जाती धर्माचा निषेध करून दोन्ही धर्मियांना एका सुत्रात गुंफले.

4) सर्वसामान्य भाषेतुन उपदेशः बहुतांशी साहित्य संस्कृत भाषेत होते. सर्वसामान्यांना संस्कृत भाषा न समजणारी होती अशावेळी गुरू नानक, कबिर मीराबाई, नामदेव, ज्ञानेश्वर यासारख्या संतानी स्थानीक भाषेतुन उपदेश करून साहित्य सुध्दा स्थानिक भाषेतच निर्माण केल्याने जनतेवर त्याचा अनुकुल परिणाम घडुन आला.

भक्ति आंदोलनातील संत

या काळातील विविध संतांनी समाजातील सर्वच स्तरातील लोकांना जागृत केले. सामाजीक विषमता दुर करून सर्व समाजात समता प्रस्तापीत करण्याचे कार्य ज्सा संतांनी केले त्यात शकराचार्य, रामानुजनाचार्य, रामानंद, चैतन्य महाप्रभु, वल्लभाचार्य, संत कबिर, सुरदास, मीराबाई, गुरू नानक, संत ज्ञानेश्वर, नामदेव इ. विविध संत होते. हे संत कोण्या एका धर्माचे जातीचे नव्हते तर उच्चवर्णियांपासुन तर अगदी शुद्रातीशुद्र पर्यत हे संत होते. बंगाल, पंजाब,

महाराष्ट्र, राजस्थान अश्या विविध प्रांतातील विविध जाती धर्माचे असुनही त्यांनी जातीप्रथा, अस्पृश्यता निर्मुलन, एकेश्वरवाद, तत्कालीन वाईट कुप्रथा यावर कडाडुन हल्ला करून समाज सुधारणा घडवुन आणण्याचा प्रयत्न केला. कबिरचे दोहे, ज्ञानेश्वर नामदेवांचे अभंग, मीराबाईचे भजने अशी कीतीतरी उदाहरणे देता येईल ज्यांनी बोली भाषेतून साहित्य अभंग, दोहे रचुन जनजागृती केली व विखुरलेल्या समाजाला एका सुत्रात गुंफण्याचे महत्वपुर्ण कार्य केले.

भक्ति आंदोलनाचा परिणाम

1) सामाजीक परिणाम:

जातपात, उच्चनोचता, रूढीप्रियता, अंधश्रध्दा या सामाजीक दोषांवर अचुक बोट ठेवून सामाजीक समतेवर आधारलेली भक्ति हाच ईश्वरप्राप्तीचा खरा मार्ग आहे. या काळातील संतानी अत्यंत तळमळीने व सातत्याने समाजास पटवून दिले. हिंदू धर्मातील उच्च निच्चता विसरून सुधारकांच्या उपदेशावर लोक वर्तन करू लागले. या काळात अनेक कुप्रथा अस्तित्वात होत्या. स्त्रियांची अवहेलना केली जात होती. सर्व वाईट कुप्रथांवर उपदेश करून समाजसुधारणा घडवून आणण्याचे महत्वपुर्ण कार्य या संतांनी केले.

2) धार्मिक परिणाम:

धर्म रक्षणासाठी नैराश्याच्या खोल गर्तेत पडलेल्या हिंदू समाजाला ईश्वरी सामर्थ्यावर विश्वास ठेवून ईश्वरास शरण जा असे विश्वासाने सांगणारी भक्ति चळवळ एक प्रभावी मार्ग होता. मंदिरातील मुर्तीच्या विध्वंसाने म्हणजेच धर्माच्या भौतिक नाशाने धर्म नष्ट होत नसतो हे संतांनी सिध्द करून दाखविले. टाळ मृदंगाच्या तालावर श्रध्दाळु भाविकता मध्ये भक्ति चळवळीचे महान यश दडलेले आहे. महत्वाचे म्हणजे कट्टरतेच्या या काळात अंधश्रसध्दा कर्मकांड नाकारून हिंदू व मुस्लिम दोन्ही धर्म एकत्र येऊन परस्पर समन्वयाचे वातावरण निर्माण झाले.

3) प्रादेशिक भाषांचा विकास:

सर्व संतांनी व त्यांच्या शिष्यांनी विविध प्रादेशिक भाषेतुन आापल्या शिकवणुकीचा प्रसार केला त्यामुळे या काळाम प्रादेशिक भाषांचा विकास घडुन आला व समृध्द वाङःमय निर्मिती घडुन आली. ज्ञानदेव , तुकाराम, चोखा महार, जनाबाई या संतांच्या अभंगांनी व ग्रंथांनी मराठी भाषा समृध्द झाली. नरसी मेहता गुजराथी तर मिराबाईने राजस्थानी भाषा समृध्द केली. संतांनी लोकभाषेतील आपला आपल्या कवनामधुन आपल्या शिकवणुकीतून सामाजीक दोष दुर केले.

4) राजकीय:

तलवारीच्या जोरावर राज्य जिंकुन, धर्म परिवर्तन करून संपूर्ण भारत इस्लाममय करणे हे उद्दिष्ट असलेल्या या काळात भक्ति चळवळीने केलेले कार्य अतुलनीय ठरले. राजसत्तेला भिक न घालता आपला अभंग, साहित्य याद्वारे राजकीय व सामाजिक जागृती या संतांनी घडवून आणली हे फार मोठे यश म्हणावे लागेल.

निष्कर्ष:

भारतीय इतिहासात मध्यकाळ हा राजनितीक, सांस्कृतीक, आर्थिक व सामाजीक इ. सर्व दृष्टीने परिवर्तन करणारा ठरला. एकीकडे इस्लामी संस्कृती भारतीय सामाजिक संरचनेला प्रभावित करत असतांना भक्ति आंदोलनाची पृष्ठभुमी तयार होत होती.भक्ति आंदोलन बहुराष्ट्रीय आंदोलनाचे उदारिण होय. आपल्या अभंगाद्वारे, उपदेशाद्वारे राष्ट्रीय आंदोलन उभारून बहुजन समाजाला संघटीत केले. वैशिष्टपुर्ण म्हणजे या चळवळीत शुद्र, मुसलमान व स्त्रिया सुध्दा मोठया प्रमाणात होत्या. सांप्रदायीक भेदभाव, सामाजिक विषमता देर करण्यात भक्ति आंदोलनाची

भुमिका युगांतकारी होती. सर्वसामान्याच्या भाषेतील रचित काव्य आणि त्यासोबत संगीत हे महत्वपुर्ण योगदान या संतांचे होते.

भक्ति चळवळ व्यापक होती. संपुर्ण देशभर तीचा प्रसार होऊन ते जन आंदोलन बनले. हिंदू धर्मात सुधारणा करून हिंदू व मुस्लिम यांच्यात समन्वय या चळवळीने साधला. हिंदू धर्मामध्ये सुधारणा करण्यात या चळवळीला यश मिळाले. अत्यंत गरिब, शुद्र कुटुंबातील यर संतांनी तत्कालीन काळात राजकीय, सामाजिक व सांस्कुतीक परिवर्तन घडवून एक आदर्श निर्माण केला.

संदर्भः


1. अग्निहोत्री पी.के. (2010). *भारतीय इतिहास.* न्यु दिल्लीः एलॉईड पब्लिशर्स.
2. कोलारकर, श. गो. *मध्ययूगीन भारताचा इतिहास इ.स. 1206 ते 1707.* नागपूरः मंगेश प्रकाशन.
3. माळी प्रतिक. *भारताचा समग्र इतिहास.* पुणेः निराली प्रकाशन.
4. मोहम्मद मलिक. वैष्णव भक्ति आंदोलन का अध्ययन. नई दिल्ली : राजपाल प्रकाशन
5. सपकाळ प्रभा. *भारताचा इतिहास.* नवी दिल्लीः एस. चांद ॲण्ड कं
6. वकिल अलिम. एका पथावरील दोन पंथः भक्ति आणि सुफी.पुणेः प्रतिमा प्रकाशन

7- https://www.loksatta.com/navneet-news/sufi-philosophy-1703277/

8- https://www.loksatta.com/navneet-news/sufi-philosophy-2-1703868/